सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २९ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## नेपाळमध्ये पुराचा हाहाकार! महाराष्ट्रातील ६० नागरिक बेपत्ता

### दुर्घटनेच्या वेळी इमिग्रेशन सेंटरमध्ये ६४४ जण होते उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ मुंबई-** नेपाळमध्ये आलेल्या भीषण पूर आणि भूस्खलनामुळे मोठी जीवितहानी झाली असून, महाराष्ट्रातील तब्बल ६० नागरिक अद्याप बेपत्ता असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या बेपत्ता नागरिकांमध्ये पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, कोल्हापूर आणि कोकणातील नागरिकांचा समावेश आहे. मुंबईतील 'हिल्स अँड ट्रेल्स' आणि काठमांडूतील 'रिचा ट्रेक्स' यांनी संयुक्त निवेदनाद्वारे ही माहिती दिली.




नेपाळ माउंटेनिअरिंग असोसिएशनच्या (छच-) बचाव पथकाने दुर्घटनाग्रस्त भागाची पाहणी केली आहे. दुर्घटनेच्या वेळी इमिग्रेशन सेंटरमध्ये भारतीय नागरिकांसह ५१७ परदेशी नागरिक आणि १२७ नेपाळी नागरिक असे एकूण ६४४ जण उपस्थित होते. डॉ. मिलिंद चितळे यांच्या नेतृत्वाखालील ६० जणांचा गट त्यावेळी एका इमारतीत वास्तव्यास होता. पुराच्या प्रचंड प्रवाहात ही इमारत वाहून गेल्याने या गटातील सर्वजण बेपत्ता झाले आहेत.

सध्या चिनी बचाव पथक, नेपाळ लष्कर आणि पोलिसांकडून घटनास्थळी शोधमोहीम सुरू आहे. व्हिडिओ फुटेज आणि हवाई पाहणीत परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे स्पष्ट झाले आहे. अद्याप या ठिकाणाहून कोणालाही सुरक्षित बाहेर काढण्यात यश आलेले नाही, अशी माहिती 'हिल्स अँड ट्रेल्स'चे प्रा. चारुहास जोशी आणि 'रिचा ट्रेक्स'चे सांगे गुरुंग यांनी दिली. दुर्घटनाग्रस्त भागातून ५०० हून अधिक मृतदेह सापडल्याची माहिती असून, मृतदेहांची अवस्था खराब असल्याने ओळख पटवण्यासाठी डीएनए नमुने घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, नेपाळ सरकारने मृतांची अधिकृत आणि अंतिम संख्या अद्याप जाहीर केलेली नाही. दरम्यान, 'मैत्री' संस्थेमार्फत यात्रेसाठी गेलेले महेश शेजवळ यांच्या नेतृत्वाखालील ६८ भाविक सुरक्षित आहेत. यात्रा पूर्ण केल्यानंतर हा गट सध्या नेपाळ-चीन सीमेवर पोहोचला आहे. पुरामुळे मुख्य मार्ग बंद झाल्याने आता 'न्यालाम-कोदारी-तातोपानी' या पर्यायी मार्गाने त्यांना काठमांडूकडे आणले जाणार आहे. भारतीय दूतावासाने काठमांडूमध्ये २४ तास सुरू असलेला मदत कक्ष स्थापन केला आहे. बेपत्ता नागरिकांच्या नातेवाइकांनी अधिक माहितीसाठी दूतावासाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्राचा आपत्ती व्यवस्थापन विभागही नेपाळ सरकारच्या सातत्याने संपर्कात असून, राज्यातील नागरिकांना सुरक्षित परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## शरद पवारांकडून १० प्रवक्त्यांची नवी यादी जाहीर

### जितेंद्र आव्हाडांसह तरुण चेहऱ्यांना संधी, रोहित पवार बैठकीला गैरहजर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) संघटनात्मक पातळीवर महत्त्वाच्या हालचाली सुरू असून पक्षाकडून नव्या १० प्रवक्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवारी जाहीर करण्यात आलेल्या या यादीत अनुभवी नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह पक्षातील अभ्यासू आणि तरुण चेहऱ्यांना प्रवक्तेपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षाची भूमिका, धोरणे आणि विविध राजकीय मुद्द्यांवर माध्यमांसमोर अधिकृतपणे भूमिका मांडण्याची जबाबदारी आता या प्रवक्त्यांवर असणार आहे.

पक्षाच्या कोअर कमिटीची महत्त्वाची बैठक शनिवारी पार पडली. या बैठकीत पक्ष संघटना मजबूत करण्यासह आगामी काळातील राजकीय रणनीती, विविध संघटनात्मक विषय आणि पक्षाच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे. या बैठकीला पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



विशेष म्हणजे, नव्या प्रवक्त्यांची नियुक्ती करण्यापूर्वी पक्षाने यापूर्वी करण्यात आलेल्या सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द केल्या होत्या. समोर आलेल्या माहितीनुसार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी पक्षाकडून याबाबत अधिकृत पत्र जारी करण्यात आले होते. शरद पवार यांच्या पक्षाच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर हे पत्र पोस्ट करण्यात आले होते. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या या पत्रात, यापूर्वी पक्षाच्या प्रवक्तापदासाठी करण्यात आलेल्या सर्व नियुक्त्या पुढील आदेशापर्यंत तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.

#### कोणाकोणावर सोपवली प्रवक्तेपदाची जबाबदारी?

पक्षाने जाहीर केलेल्या नव्या यादीत अनुभवी नेत्यांसोबतच तरुण आणि विविध सामाजिक घटकांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली आहे. जितेंद्र आव्हाड, क्लाईड क्रास्टो, भीमराव हत्तीअंबीरे, अनिश गवांदे, अ‍ॅड. फैजल मिर्झा, महेबूब इब्राहीम शेख, प्रवीण कुंटे पाटील, प्रशांत सोनबा वीरकर, अ‍ॅड. हेमाताई पिंपळे आणि डॉ. चंद्रकांत बारेला यांचा समावेश आहे. यापैकी जितेंद्र आव्हाड हे पक्षातील आक्रमक आणि अभ्यासू भूमिका मांडणाऱ्या नेत्यांपैकी एक मानले जातात. त्यामुळे त्यांच्याकडे पुन्हा प्रवक्तेपदाची जबाबदारी देणे हे पक्षाच्या माध्यमांमधील आक्रमक भूमिकेच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. त्याचबरोबर अनिश गवांदे, महेबूब शेख आणि हेमाताई पिंपळे यांसारख्या तुलनेने नव्या चेहऱ्यांना संधी देत पक्षाने प्रवक्त्यांच्या टीममध्ये वैविध्य आणण्याचा प्रयत्न केला आहे.

## डफरीन अग्निकांडाची पोलीस चौकशी करा

### चित्रा वाघ यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती :** जिल्हा स्त्री रुग्णालयातील एसएनसीयू (डछउण) अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची सखोल पोलीस चौकशी करण्यात यावी, अशी मागणी भाजप नेत्या तथा आमदार चित्रा वाघ यांनी केली आहे. या संदर्भात त्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.आमदार चित्रा वाघ यांनी शनिवारी जिल्हा स्त्री रुग्णालयाला भेट देऊन आगीच्या घटनेतील एसएनसीयू विभागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी मुख्य शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांच्याकडून संपूर्ण घटनेची माहिती घेतली.या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा स्त्री रुग्णालय प्रशासनाकडून परस्परविरोधी दावे करण्यात येत असल्याचे सांगत, नेमके कोण खरे आणि कोण खोटे बोलत आहे, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे चित्रा वाघ यांनी म्हटले. तसेच अग्निसुरक्षा व्यवस्थेचे फायर ऑडिट झाले होते की नाही, रुग्णालय प्रशासनाने संबंधित विभागांशी आवश्यक पत्रव्यवहार केला होता का, तसेच अग्निसुरक्षे संदर्भातील जबाबदारी नेमकी कोणाची होती, याचीही पोलिसा मार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.तीन निष्पाप नवजात बालकांचा जीव गेल्याने या घटनेतील प्रत्येक बाब तपासून दोषींवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी चित्रा वाघ यांनी केली आहे.



## या सरकारची काय नाटके सुरू आहेत, हेच समजत नाही

### जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात मृत्यूंवरून यशोमती ठाकूर संतप्त; सरकारवर गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**

जिल्हा स्त्री रुग्णालयातील तीन नवजात बाळांच्या मृत्यू प्रकरणावरून काँग्रेसच्या नेत्या तथा माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. रुग्णालयात वारंवार दौरे करून केवळ तमाशा केला जात असून प्रत्यक्षात सरकारचे कामकाज कुठेच दिसत नसल्याचा आरोप त्यांनी केला.या सरकारची काय नाटके सुरू आहेत, हेच समजत नाही. लोकप्रतिनिधी पर्यटनासारखे दवाखान्यात येत आहेत आणि आरडाओरडा करून निघून जात आहेत. मात्र, सरकारचा धाक या ठिकाणी राहिलेला नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया ठाकूर यांनी दिली.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अद्याप रुग्णालयात पोहोचले नसल्याचा मुद्दा उपस्थित करत, त्यांचा पाणीपुरी खातानाचा व्हिडिओ मात्र समोर येतो, असा टोला त्यांनी लगावला. हनुमान गाडीवर १२१ कोटी रुपये खर्च केले जातात; मात्र जिल्हा स्त्री रुग्णालयासाठी आवश्यक नऊ कोटी रुपये दिले जात नाहीत, असा आरोपही त्यांनी केला.उगाच नाटक आणि आरडाओरडा बंद करा. रोज कोणी हिरो-हिरोईनसारखे लोकप्रतिनिधी येऊन सरकार काम करत असल्याचे सांगतात; पण वास्तवात अमरावतीकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे, असेही यशोमती ठाकूर म्हणाल्या.

## अकोल्यात ५ कोटींच्या भूखंडाचा घोटाळा

### ठाकरे गटाच्या युवा सेना जिल्हाप्रमुखासह तिघे पोलिसांच्या ताब्यात




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अकोला -** अकोल्यातील मलकापूर परिसरात तब्बल ५ कोटी रुपये किमतीच्या भूखंडाची बनावट कागदपत्रांच्या आधारे परस्पर विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात अकोला पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत तीन जणांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये उद्धव ठाकरे गटाच्या युवा सेनेचा अकोला जिल्हाप्रमुख आस्तिक श्रीकृष्ण चव्हाण याचा समावेश असल्याने या प्रकरणाला राजकीय वळण मिळाले आहे. मलकापूर भागातील सुमारे ५ हजार ७५ चौरस फुटांचा मोक्याचा भूखंड ८४ वर्षीय शांता बाहेकर यांच्या मालकीचा आहे. या भूखंडाशी संबंधित व्यवहारात गैरप्रकार झाल्याची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली होती. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने तपास सुरू केला. नेमकं काय आहे प्रकरण?

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी शांता बाहेकर यांच्या नावाने बनावट कुलमुखत्यारपत्र तयार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर या कागदपत्रांचा वापर करून भूखंडाच्या व्यवहारासाठी आवश्यक कागदपत्रे तयार करण्यात आली. विशेष म्हणजे, प्रत्यक्ष मालक असलेल्या ८४ वर्षीय महिलेऐवजी दुसऱ्याच महिलेला शांता बाहेकर म्हणून उभे करण्यात आल्याचा पोलिसांचा आरोप आहे. या महिलेच्या माध्यमातून बनावट खरेदीखत तयार करून भूखंडाची विक्री करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. बाजारभावानुसार या भूखंडाची किंमत जवळपास ५ कोटी रुपये असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यासह तिघांना अटक

या प्रकरणात पोलिसांनी आस्तिक श्रीकृष्ण चव्हाण, राहुल जाधव आणि प्रियंका पाटील ऊर्फ प्रियंका चव्हाण या तिघांना अटक केली आहे. आस्तिक चव्हाण हा उद्धव ठाकरे गटाच्या युवा सेनेचा अकोला जिल्हाप्रमुख असल्याची माहिती आहे. तर प्रियंका पाटील ही आस्तिक चव्हाण यांची वहिनी असल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, तिघांनी संगनमत करून हा व्यवहार केल्याचा आरोप आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणात नेमकी कोणाची काय भूमिका होती, याचा तपास अद्याप सुरू आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक निर्णय

### उईकेंचे उपोषण मागे घेण्याचे आवाहन

### विविध प्रश्नांवर तीन महिन्यांत कार्यवाहीचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९मुंबई**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्री आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी मांडलेले प्रश्न आणि मागण्या मुख्यमंत्र्यांनी मान्य केल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्रातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनांमधून विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्व प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्याचे उईके यांनी सांगितले. तसेच पुणे, नागपूर आणि नाशिक येथे उपोषणाला बसलेल्या विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेऊन आपले दैनंदिन कामकाज आणि अभ्यास सुरू करावा, असे आवाहनही त्यांनी केले.येत्या तीन महिन्यांनंतर विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मागण्यांवर झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी करताना कोणत्या अडचणी निर्माण झाल्या, याचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री पुन्हा विद्यार्थ्यांसोबत चर्चा करणार असल्याचेही उईके यांनी सांगितले.विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्यांपैकी अनुसूचित जमातीच्या बिंदूनामावलीतील स्थानाचा प्रश्न महत्त्वाचा होता. २०१७ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीचा बिंदूनामावलीमध्ये दुसरा क्रमांक असावा, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. या संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीला तीन महिन्यांच्या आत शिफारस सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे उईके यांनी स्पष्ट केले.



**पेसा अंतर्गत नोकरभरतीला गती -** पेसा अंतर्गत नोकरभरतीच्या प्रश्नावरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. पेसा अंतर्गत एकूण १७ संवर्ग असून, त्यापैकी ९ संवर्गांची नोकरभरती झाल्याचे उईके यांनी सांगितले. उर्वरित संवर्गांमधील नोकरभरती सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ६ जुलै २०२१७ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून अधिसंख्य पदांबाबतही कार्यवाही करण्यात येणार आहे. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नोकरी मिळावी यासाठी पदांची संख्या निश्चित करण्याची प्रक्रिया तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे, तर त्यानंतर सहा महिन्यांच्या आत पुढील संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती उईके यांनी दिली.

**आश्रमशाळांमधील गैरसोयींचे थर्ड पार्टी ऑडिट**

अनुदानित तसेच शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या गैरसोयींच्या प्रश्नावरही बैठकीत चर्चा झाली. आश्रमशाळांमधील सुविधांची पाहणी करण्यासाठी थर्ड पार्टी ऑडिट करून आढळलेल्या त्रुटींवर तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे उईके यांनी सांगितले.दरम्यान, महाराष्ट्रातील विविध ठिकाणी उपोषणाला बसलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांनी आपले उपोषण मागे घ्यावे आणि अभ्यासाकडे लक्ष द्यावे, असे आवाहन आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केले आहे.

## संपादकीय ......

# महायुतीत फडणवीसच ‘बिग बॉस’

*गेल्याच आठवड्यात राज्य सरकारने ‘महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम, २०२६’ अधिसूचीत केले होते. या नियमांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना कुठल्याही मंत्र्यांचा निर्णय फिरवण्याचे सर्वाधिकार प्राप्त झाले आहेत. हे नियम मंजूर होऊन आठवडा उलटत नाही, तोच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मराठी सक्तीच्या निर्णयाला ब्रेक लावला. हा झटका केवळ एका खात्यापुरता मर्यादित नसून तो थेट शिवसेना शिंदे गट आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय आकांक्षांवर केलेला आघात मानला जात आहे. खरे तर १९७५ च्या जुन्या नियमावलीतही मुख्यमंत्र्यांना मंत्र्यांचे निर्णय रद्द करण्याचे किंवा त्यात हस्तक्षेप करण्याचे अधिकार होते; परंतु ‘महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम, २०२६’ मुळे हे अधिकार अधिक स्पष्ट, मजबूत आणि कायदेशीर चौकटीत घट्ट बसवणारे ठरले आहेत. या नव्या नियमावलीच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय आणि राजकीय निर्णयांवर आपले पूर्ण नियंत्रण सिद्ध केले आहे.*

*महाराष्ट्रातील रिक्षा-टॅक्सी चालविणार्या अमराठी चालकांना प्रवाशांशी मराठीतून संवाद साधता यावा, यासाठी परिवहन विभागाने मागच्या ३ महिन्यांपासून कायद्याची कडक अंमलबजावणी सुरू केली आहे. परिवहन विभागाने अमराठी चालकांसाठी १०५ दिवसांचा विशेष मराठी भाषा प्रशिक्षण उपक्रमही राबवला. यानंतरही मराठीतून संवाद साधता न येणार्या चालकांना थेट परवाना निलंबित करण्याची कारवाई वाहतूक पोलिसांनी सुरू केली होती. या कारवाईला अमराठी चालकांकडून जोरदार विरोध झाल्यानंतर प्रताप सरनाईक यांनी मराठी शिकण्यासाठी त्यांना आणखी ३ महिने वाढवून दिले. परंतु, त्यानंतरही मराठी न आल्यास कडक कारवाईचा इशारा दिला. मराठी सक्तीच्या या मुद्द्यांवर महाराष्ट्रातील विशेषकरून मुंबईतील सामाजिक, राजकीय वातावरण ढवळून निघाले असताना मुख्यमंत्र्यांनी या निर्णयात हस्तक्षेप करत मराठी सक्तीला थेट १ वर्षाची मुदतवाढ देऊन टाकली. एका अर्थाने मुख्यमंत्र्यांनी सरनाईकांच्या निर्णयातील हवाच काढून घेतली आहे. प्रताप सरनाईक यांचा हा निर्णय शिवसेना शिंदे गटाच्या प्रादेशिक आणि मराठी अस्मितेच्या राजकारणाला साजेसा असाच होता. परंतु देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय फिरवून स्पष्ट संकेत दिले की, तुम्ही परस्पर कितीही, कोणतेही निर्णय घ्या, शेवटी महायुती सरकारचा ‘रिमोट कंट्रोल’ केवळ आणि केवळ माझ्याच हातात राहील. तसे बघायला गेले तर अजित पवार यांच्या मृत्यूनंतर राष्ट्रवादी काँग्रेस स्वत:च्याच गुंत्यात अडकून पडलेली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुतीतल्या राष्ट्रवादीचा सत्ता कारभार अतिशय शांतपणे आणि सावध भूमिका घेऊन सुरू आहे. त्याचा अर्थातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फारसा त्रास नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या अधिकारांना आव्हान देणारा एकमेव गट म्हणजे शिंदे गट. परंतु फडणवीसांनी शिंदे गटाची चुळबूळही वेळीच रोखून धरण्याचे ठरवले आहे. सरनाईकांचा निर्णय फिरवून देवेंद्र फडणवीस यांनी एकाच वेळी दोन मोठे राजकीय उद्देश साध्य केले आहेत. पुढील वर्षाच्या सुरुवातीला उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. महामुंबईत राहणार्या उत्तर भारतीय चालकांच्या रोषाचा फटका थेट उत्तर प्रदेशातील भाजपच्या राजकीय समीकरणांना बसू शकला असता. फडणवीसांनी हा रोष वेळेत शमवला आहे. दुसरीकडे, शिंदे गटाच्या मंत्र्याने घेतलेला आणि गाजणारा निर्णय थेट मुख्यमंत्र्यांनी बदलल्यामुळे मंत्रिमंडळात मुख्यमंत्र्यांचाच शब्द अंतिम आहे, हेदेखील त्यांनी दाखवून दिले.*

*महायुती सरकारच्या दुसर्या कार्यकाळात मुख्यमंत्रीपदाची धुरा आपल्याच खांद्यावर राहावी, यासाठी एकनाथ शिंदे यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले होते. मात्र, भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने मुख्यमंत्रिपदाची माळ देवेंद्र फडणवीस यांच्याच गळ्यात घातली. तेव्हापासून शिंदे यांच्या मनात एक सुप्त असंतोष आणि पुन्हा मुख्यमंत्री होण्याची तीव्र इच्छा कायम असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. त्यातच कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनानंतर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला होता. प्रधान यांच्या जागी केंद्रीय मंत्रिमंडळात देवेंद्र फडणवीस जाणार या चर्चांनी महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जोर धरला आहे. त्यासाठी काहीजण देव पाण्यात ठेवून बसल्याचेही म्हटले जाते. अशा सगळ्या गोंधळाच्या वातावरणात दिल्लीतील वरिष्ठ नेतृत्वासोबत संबंध मजबूत ठेवून, राज्यात पुन्हा एकदा आपली पकड निर्माण करण्याचा शिंदेंचा प्रयत्न आहे. त्यासाठी शिंदेंच्या दिल्ली वार्या आजही थांबलेल्या नाहीत. मात्र, फडणवीस काही केल्या महाराष्ट्राची सूत्रे सोडायला तयार नाहीत, हीच महायुतीतील संघर्षाची मुख्य ठिणगी ठरत आहे. बाहेरून महायुतीचे सरकार अत्यंत मजबूत आणि एकसंध दिसत असले, तरी आतून मात्र वर्चस्वाचा हा खेळ कमालीचा तीव्र झाला आहे. दोन्ही नेतृत्वामधून ‘विस्तवही जात नाही’ अशी स्थिती निर्माण झाली आहे. सध्याच्या घडीला देवेंद्र फडणवीस हे राज्यातील भाजपचे सर्वात वजनदार नेते आहेत, याबाबत कुणाचेही दुमत असायचे कारण नाही. पक्षाची संपूर्ण ताकद आणि प्रशासनावरील पकड देवेंद्र फडणवीस यांच्याच हातात आहे. त्यामुळे केंद्रीय पातळीवरून कितीही, काहीही हालचाली झाल्या, तरी राज्यात स्वत:चे स्थान कमकुवत होऊ न देण्याची खबरदारी घेतानाच महायुतीत आपणच ‘बिग बॉस’ असल्याचे देवेंद्र फडणवीस दाखवून देत आहेत.*

# रस्त्यांवरील क्रूर वास्तव: ट्रकची मागची चाके आणि निष्पाप जीवांचा बळी

राष्ट्रीय महामार्गांवरून प्रवास करताना किंवा शहरातील गर्दीच्या रस्त्यांवरून दुचाकी चालवताना बाजूने वेगाने जाणारा भलामोठा ट्रक पाहिला की आजही अनेकांच्या पोटात भीतीचा गोळा येतो. ही भीती अवाजवी नसते, तर रस्त्यांवर रोज घडणाऱ्या क्रूर वास्तवातून ती जन्माला आली आहे. दुचाकीचे अचानक संतुलन बिघडणे, खड्ड्यामुळे गाडी घसरणे आणि थेट शेजारून जाणाऱ्या ट्रकच्या मागच्या चाकाखाली जाऊन क्षणात होत्याचे नव्हते होणे, हे चित्र आज देशात नित्यनेमाने पाहायला मिळते. क्षणापूर्वी हसतमुखाने प्रवास करणारी व्यक्ती दुसऱ्याच क्षणी शरीराचा चेंदामेंदा होऊन रस्त्यावर निपचित पडते. डोळ्यादेखत आपल्या पोटच्या गोळ्याला, आई-वडिलांना किंवा जोडीदाराला अशा अमानुष पद्धतीने संपताना पाहणाऱ्या नातेवाइकांच्या नशिबी येणारा जन्मभराचा मानसिक आघात कोणत्याच भरपाईने भरून निघणारा नाही.

रस्त्यावरील अचानक समोर येणारा खड्डा, रस्त्याच्या कडेला साचलेली खडी, डांबराचे अनपेक्षित उंचवटे किंवा पावसाळ्यात साचलेले पाणी यामुळे दुचाकी घसरते. दुचाकीचालक सावध असला तरी वाहनाचे नियंत्रण सुटते आणि बाजूला पडणारी व्यक्ती ट्रकच्या मधल्या पोकळीतून थेट मागच्या महाकाय चाकाखाली ओढली जाते. अशावेळी जर तकलादू आणि निकृष्ट दर्जाचे हेल्मेटही जीव वाचवू शकत नाही. असे हेल्मेट रस्त्याच्या कडेला सर्रास विकले जातात. त्यावर नियंत्रणासाठी पोलीस यंत्रणा सक्षम नाही का, असा प्रश्न निर्माण होतो. अशा हेल्मेटच्या विक्रीवर तत्काळ बंदी आणली पाहिजे.

### सुरक्षा जाळीची तांत्रिक गरज

या समस्येवर तांत्रिक आणि व्यावहारिक उपाय उपलब्ध नाहीत असे नाही. ट्रकच्या बाजूला आणि मागच्या चाकांच्या भोवती बसवण्यात येणारी ’सुरक्षा जाळी’ हा यातील अत्यंत प्रभावी पर्याय आहे.

१. शारीरिक अडथळा: ट्रकच्या दोन्ही बाजूला जमिनीपासून ठरावीक अंतरावर (जास्तीत जास्त ३० ते ४० सेमी) मजबूत धातूचे पॅनेल्स किंवा ग्रीड जाळी बसवल्यास घसरलेली व्यक्ती ट्रकच्या चाकाखाली न जाता बाजूला फेकली जाते. यामुळे फ्रॅक्चर किंवा किरकोळ जखमा होतील, पण थेट चिरडले जाऊन होणारा मृत्यू नक्कीच टळू शकतो.

२. आधुनिक सेन्सर्सचा वापर: आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अवजड वाहनांच्या मागच्या भागासाठी ’अल्ट्रासोनिक प्रॉक्सिमिटी सेन्सर्स’ आणि ’३६०-डिग्री ब्लाइंड स्पॉट कॅमेरे’ सहज उपलब्ध आहेत. चाकांपासून १-२ मीटरच्या अंतरावर कोणतीही हालचाल झाल्यास चालकाच्या डॅशबोर्डवर तात्काळ अलार्म वाजणारी प्रणाली बसवणे आर्थिकदृष्ट्या सहज शक्य आहे.

### ’ब्लाइंड स्पॉट’ आणि संरचनेतील दोष

अवजड वाहनांची रचना जमिनीपासून पुरेशी उंच असते. पुढील आणि मागच्या चाकांच्या मध्ये मोठी मोकळी जागा असते. बहुतांश ट्रकचालकांना त्यांच्या डाव्या आणि उजव्या बाजूच्या मागील भागाचे दृश्य (इश्रळपव ड्रॉ) आरशातून स्पष्ट दिसत नाही. चालकाच्या केबिनमध्ये बसलेल्या व्यक्तीला मागील चाकाजवळ कोण आले किंवा पडले आहे, याचा अंदाजच येत नाही. चाकाखाली आल्यावर जेव्हा गाडीला हादरा बसतो, तेव्हाच चालकाला अपघाताची जाणीव होते; परंतु तोपर्यंत निष्पाप जीवाचा खेळ खल्लास झालेला असतो.

**नितीन देशमुख**
माजी नगरसेवक, अमरावती.



### कायद्याची अंमलबजावणी आणि अनास्था

केंद्रीय मोटार वाहन नियमावलीत बाजूच्या संरक्षक पट्ट्यांसंदर्भात तरतुदी आहेत; मात्र त्यांची अंमलबजावणी कागदावरच अधिक दिसते.

### रस्त्यांच्या देखभालीकडे कमालीचे दुर्लक्ष

केवळ वाहनांची रचना बदलून चालणार नाही, तर या अपघातांचे मूळ कारण असलेल्या रस्त्यांवरील खड्ड्यांवरही तितकाच कठोर प्रहार आवश्यक आहे. करोडो रुपयांचा टोल वसूल करणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला आणि स्थानिक सार्वजनिक बांधकाम खात्याला रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे जाणाऱ्या जीवांची जराही फिकीर उरलेली नाही. खड्ड्यामुळे अपघात होऊन जर कोणाचा मृत्यू होत असेल, तर तो केवळ अपघात नसून यंत्रणेने केलेला घात आहे.सुरक्षित रस्ते हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय आणि राज्य परिवहन विभागाने या विषयाला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. स व ' व्यावसायिक अवजड वाहनांना (ट्रक, डंपर, टँकर, ट्रेलर, बसेस) अनिवार्यपणे प्रमाणित ’इम्पॅक्ट-रेझिस्टंट’ व्हील गार्ड्स सक्तीचे करावेत. फिटनेस तपासणीत सीसीटीव्ही फुटेजसह या सुरक्षेची खातरजमा केली जावी. व्यावसायिक वाहनांसाठी ’ब्लाइंड स्पॉट डिटेक्शन’ प्रणालीच्या टप्प्याटप्प्याने सक्तीचे धोरण आखले जावे.अपघातानंतर कुटुंब उद्ध्वस्त झाल्यावर दिल्या जाणाऱ्या काही लाखांच्या मदतीपेक्षा, त्या कुटुंबाचा आधार चाकाखाली चिरडलाच जाणार नाही अशी अभेद्य सुरक्षा व्यवस्था रस्त्यांवर उभारणे हेच खरे सुशासनाचे लक्षण ठरेल.

# कृषी सहसंचालक पोहचले थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

## संवाद साधत शेतीशाळेचे मार्गदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ अमरावती**

अमरावती विभागीय कृषी सहसंचालक डॉ. गणेश घोरपडे यांनी दर्यापूर तालुक्यातील मौजे शिंगणापूर, पनोरा गावातील शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जात खरीप पिकांची पाहणी केली. तसेच शेतकरी गटांशी संवाद साधुन मार्गदर्शन केले.यावेळी शिंगणापूर येथील प्रगतीशील शेतकरी संदिप लोहकपुरे यांच्या नैसर्गिक सोयाबीन शेतीशाळा प्रत्यक्षिक प्लॉटला भेट दिली व शेतीशाळेच्या माध्यमातून प्रत्यक्ष झालेला फायदा त्याचे व्यवस्थापण, जैविक निविष्ठा निर्मिती तसेच कपास क्रांती योजने अंतर्गत कापुस प्रक्षेत्राला भेट दिली. यावेळी पिक परिस्तिथी जाणून घेत कमी पावसा च्या खंडात कराक्याच्या उपाययोजने विषयी मार्गदर्शन केले. याचवेळी पनोरा येथील युवा पुरस्कार प्राप्त शेतकरी कुलदिप टोळे यांच्या ॲग्रोटेक फार्म लॅबला भेट देत फार्म लॅबच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेले उपक्रम व उत्पादीत ट्रायकोडर्मा, चिकट सापळे इतरमाहिती घेत शेतकऱ्याच्या समस्या जाणून घेत उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी प्रफुल सातव, आत्मा समितीचे उपसंचालक विवेक टेकाडे, तालुका कृषी अधिकारी आरती साबळे यासह कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# महावितरणने काढल्या खांबांवरील वेली

## नऊ किलोमीटर अंतरातील ३३ केव्ही वीजवाहिनी केली मोकळी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ पथ्रोट-** गाव हद्दीतील वीजवाहिनीला अडचणीच्या ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या व वेलींचा विळखा दूर केल्यानंतर महावितरणने आता ३३ केव्ही वीजवाहिनीवरील वेली आणि फांद्यांची छाटणी केली आहे. गावातील महावितरण कार्यालयापासून १३२ केव्ही उपकेंद्रापर्यंतच्या नऊ किलोमीटर अंतरातील वाहिनी मोकळी करण्यात आली असून, संभाव्य अपघात टाळण्यासाठी ही कार्यवाही करण्यात आली. महावितरण कार्यालयातून रहिवाशांच्या घरांपर्यंत रस्त्याच्या कडेला उभारलेल्या विद्युत खांब व वीजवाहिन्यांद्वारे वीजपुरवठा केला जातो. रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांच्या फांद्या आणि वेली वाढून वीजवाहिन्यांमध्ये अडकतात. त्यामुळे वीजवाहिनीला धोका निर्माण होऊन अपघाताची शक्यता वाढते. सध्या पावसाळा सुरू असल्याने वादळी वारे व मुसळधार पावसामुळे झाडांच्या फांद्या वीजवाहिन्यांवर तुटून पडण्याची शक्यता असते. फांद्यांच्या वजनामुळे वीजवाहिनी तुटून जमिनीवर पडल्यास त्यामध्ये विद्युत प्रवाह सुरू राहण्याचा धोका असतो. अशा वाहिनीच्या संपर्कात व्यक्ती अथवा जनावरे आल्यास जीवितहानी होऊ शकते. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी वीजवाहिन्यांमध्ये अडकलेल्या फांद्यांची पाहणी करून त्यांची छाटणी करण्याचे काम महावितरणकडून केले जाते. गाव हद्दीतील कामे पूर्ण केल्यानंतर महावितरणने ३३ केव्ही वीजवाहिनीच्या नऊ किलोमीटर अंतरातील विद्युत खांब व वाहिनीवरील वेलींचा विळखा दूर केला. तसेच अडचणीच्या ठरणाऱ्या फांद्यांची छाटणी करण्यात आली. सहायक अभियंता दिगंबर मौदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वीज कर्मचारी जीवन खरात, सचिन बागडे, सूरज राघोर्ते, सुशील वाकोडे, नितीन कोल्हे, अभिजित गोवारे, मनीष उके व श्याम वाटाणे यांनी ही कार्यवाही केली.

# राज्य महोत्सव गणेशोत्सव स्पर्धेत सहभागी व्हावे

## विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती १४**

महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक गणेशोत्सव हा ‘राज्य महोत्सव’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत ‘उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा’ तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. अमरावती विभागातील अधिकाधिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छूक व पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या पोर्टलवरून सात सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावयाचा आहे.

स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेकडे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक गणेशोत्सव मंडळांनाच सहभागी होता येईल. नवीन मंडळांना संधी देण्याच्या उद्देशाने चालू आर्थिक वर्षाच्या मागील सलग दोन वर्षांत राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय पारितोषिक मिळविलेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे यंदाच्या पारितोषिकासाठी पात्र ठरणार नाहीत. ही अट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मंडळांनाही लागू राहणार आहे.

मंडळांनी केलेल्या कामाचा कालावधी मागील वर्षाच्या अनंत चतुर्दशीपासून चालू वर्षाच्या अनंत चतुर्दशीपर्यंत ग्राह्य धरला जाणार आहे. विविध स्तरांवरील विजेत्या मंडळांना भरघोस रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.



राज्यस्तरीय निवड समितीकडे आलेल्या ३६ जिल्हास्तरीय प्रथम विजेत्या मंडळांपैकी राज्यस्तरावरील पहिले तीन विजेते वगळता उर्वरित ३३ मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी ५० हजार रुपये व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

उत्कृष्ट मंडळांची निवड करताना कला व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन, निसर्ग तसेच सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन, सामाजिक कार्य आणि गणेशोत्सव आयोजनातील विधायकता आदी निकषांवर १०० गुणांचे परीक्षण केले जाणार आहे. पर्यावरणपूरक मूर्ती व सजावट, महिलांचा ३० टक्के सहभाग आदी बाबींचाही विचार केला जाणार आहे. स्पर्धेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रियेची माहिती जाणून घेण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजीचा शासननिर्णय पाहावा. तसेच पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या अधिकृत संकेतस्थळावरील संबंधित पोर्टलला भेट द्यावी. समाजाभिमुख आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणाऱ्या अमरावती विभागातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी उत्स्फूर्तपणे व मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन गुंडे यांनी केले.



# झाडांच्या वाढलेल्या फांद्यांमुळे अपघाताला निमंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ वरुड –** तालुक्यातील ग्रामीण भागातील अरुंद रस्त्यांवर दोन्ही बाजूंच्या झाडांच्या फांद्या रस्त्यावर झुकल्याने वाहनचालकांना समोरून येणारी वाहने दिसत नाहीत. त्यामुळे वळणांवर अपघाताचा धोका वाढला असून, बसचालकांनी तक्रारी करूनही फांद्या तोडण्याकडे ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. पिंपळखुटा ते लोणी, टेंभूरखेडा ते भेमंडी, पवनी ते देऊतवाडा, उदापूर ते खानापूर, लोणी ते बेलोरा, जामगाव ते एकलवीर या रस्त्यांवर दोन्ही बाजूंच्या झाडांच्या फांद्या रस्त्यावर झुकलेल्या आहेत. त्यामुळे वळणाच्या ठिकाणी समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने चालकांना मोठी कसरत करावी लागते. आधीच ग्रामीण भागातील रस्ते अरुंद असताना समोरून मोठे वाहन आल्यास दोन्ही वाहनचालकांना वाहने रस्त्याच्या खाली उतरवावी लागतात. यात बसचे बाजूचे आरसे व दिवे तुटण्याच्या घटनाही घडतात. या समस्येबाबत बसचालकांनी वरुड आगारप्रमुखांकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत. त्यानंतर आगारप्रमुख आशिष तागडे यांनी संबंधित ग्रामपंचायती तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार करून रस्त्यावरील अडथळा ठरणाऱ्या फांद्या तोडण्याची मागणी केली आहे.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# जिल्ह्याचा शिक्षण विभाग ॲक्शन मोडवर

## शाळांमध्ये 'फायर सेफ्टी' साठी १० सप्टेंबरची डेडलाईन!

**सुधीर केने**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती:**

१०शाळांमधील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हा परिषद अमरावती येथील प्राथमिक व माध्यमिकशिक्षण विभागाने एक महत्त्वाचे परिपत्रक जारी केले आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अग्निसुरक्षा उपाययोजना आणि उपकरणे बसवणे तसेच ती अद्ययावत ठेवणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांचे काटेकोर पालन करून येत्या १० सप्टेंबर २०२६ पूर्वी आपल्या स्तरावरील अहवाल




कार्यालयास सादर करण्याचे आदेश मुख्यध्यापकांना देण्यात आले आहेत.जिल्हाधिकारी अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेतील सूचनेनुसार हे पाऊल उचलण्यात आले आहे. शाळांमध्ये संभाव्य आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.शाळेच्या प्रत्येक मजल्यावर, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक कक्ष आणि माध्यान्ह भोजन स्वयंपाकघरात चालू स्थितीतील अग्निशामक यंत्रे लावणे आवश्यक आहे.सर्व अग्निशामक उपकरणांची मुदत तपासून त्यांची दरमहा देखभाल व रिफिलिंग सुनिश्चित करावी.शाळेतील जिने, मुख्य द्वार आणि आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग नेहमी मोकळे ठेवावेत. तिथे कोणत्याही प्रकारचे साहित्य साठवून ठेवू नये. असेही आदेशात म्हटले आहे. आपत्कालीन परिस्थितीत प्रसंगावधान राखून सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी वर्षातून किमान दोनदा विद्यार्थी व शिक्षकांसाठी मॉक ड्रिल आयोजित करावी.शाळेतील सर्व वायरिंग, मेन स्विचेस व विद्युत उपकरणांची अधिकृत इलेक्ट्रीशियनकडून तपासणी करून घ्यावी, जेणेकरून शॉर्ट सर्किटमुळे होणारा धोका टाळता येईल. असेही आदेश देण्यात आले आहेत.

### माहिती फलक बंधनकारक

शाळेच्या प्रमुख ठिकाणी अग्निशामक दल (१०१), रुग्णवाहिका (१०२) व स्थानिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे फोन नंबर स्पष्ट दिसतील असे फलक लावावेत.सदर आदेशांचे सर्व शाळांवर योग्य पालन होत आहे की नाही, याची शहानिशा करण्याची जबाबदारी स्थानिक गटशिक्षणाधिकारी व शिक्षण अधिकारी (म.न.पा. अमरावती) यांच्यावर सोपवण्यात आली आहे.- **प्रिया देशमुख** शिक्षण अधिकारी माध्यमिकअमरावती.

# हत्या प्रकरणानंतरही विद्याभारती परिसरात रात्रीची गर्दी कायम

## कायदा-सुव्यवस्थेवर नागरिकांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती :**

शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण करणारे चित्र विद्याभारती महाविद्यालयालगतच्या परिसरात समोर आले आहे. मागील महिन्यात याच परिसरात एका तरुणाची हत्या झाल्याची गंभीर घटना घडली होती. मात्र, या घटनेनंतरही परिसरातील रात्रीची वर्दळ आणि गर्दी कमी झालेली नसल्याने स्थानिक नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरातील कोको कॅफेसह काही आस्थापने रात्री उशिरापर्यंत सुरू राहत असून रात्री ११ वाजल्यानंतरही येथे तरुण-तरुणींच्या बैठका, गप्पा



आणि मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरू असते. मध्यरात्रीपर्यंत परिसरात गर्दी कायम राहत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.विशेष म्हणजे, या ठिकाणापासून पोलीस आयुक्त कार्यालय अगदी जवळ असतानाही रात्रीच्या वेळी अशी परिस्थिती कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित आस्थापनांना रात्री उशिरापर्यंत व्यवसाय सुरू ठेवण्याची परवानगी आहे का, तसेच निर्धारित वेळा व इतर नियमांचे पालन होत आहे का, याबाबत प्रशासनाने स्पष्टता करावी, अशी मागणी होत आहे.दरम्यान, परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासन व महापालिका यंत्रणा या प्रकरणाची दखल घेऊन काय कारवाई करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# डॉ. बोंडे यांच्या वडिलांना शिवीगाळ केल्याचा आरोप

## मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मोर्शी** अमरावती जिल्ह्यात वाद पुन्हा एकदा समोर आला असून, राज्यसभा सदस्य तथा भाजप खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या वडिलांना अवाच्च शिवीगाळ व धमकी दिल्याप्रकरणी मोर्शी पो लीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मोर्शी तालुक्यातील येरला येथील सुनील विठ्ठलराव सोमवंशी यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचेच जिल्हा प्रमुख पराग गुडधे यांनी एका वृत्तवाहिनीवर जाहीरपणे डॉ. अनिल बोंडे यांच्या वडिलांबाबत अपमानास्पद वक्तव्य करून शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.तक्रारदाराने या प्रकरणामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाल्याचे सांगितले असून, डॉ.अनिल बोंडे यांच्या कुटुंबाच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचीही भीती व्यक्त केली आहे. त्यामुळे पराग गुडधे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर या प्रकरणाची नोंद घेण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करत आहेत. याप्रसंगी सुनील सोमुवंशी, दत्ता गेडाम, अजय आगरकर, जयश्री आगरकर, प्रीती देशमुख, ब्रम्हानंद देशमुख, नितीन पन्नासे, नितीन उबाळे, जितेंद्र गेडाम, रवींद्र मोरे, सतीश लेकुरवाडे, कैलास फंदे, ज्योती मालवीय, राहुल चौधरी, अजिंक्य लुंगे, अनिता लांजेवार, पवन देशमुख, श्रीकांत सिंनकर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## सणासुदीच्या पार्श्वभूमीवर शहरातील साखर व्यापारी, वितरक व मोठ्या गोदामांची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९अमरावती** साखरेच्या वाढत्या दरांसह राज्यातील काही भागांत निर्माण झालेल्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर सणासुदीच्या काळात कृत्रिम टंचाई, साठेबाजी आणि नफेखोरीला आळा घालण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाने अमरावती शहरात विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत साखर वितरक, व्यापारी तसेच मोठ्या प्रमाणात साखरेचा वापर करणाऱ्या ग्राहकांच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत आहे.केंद्र सरकारने २८ जुलै रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार साखरेच्या साठवणुकीवर निर्बंध लागू करण्यात आले असून, हे निर्बंध १ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर या कालावधीत लागू राहणार आहेत. सरकारी संस्था आणि सार्वजनिक वितरण प्रणाली वगळता अन्य साखर विक्रेते व वितरकांना साखर प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांपेक्षा अधिक काळ साठा ठेवता येणार नाही. तसेच कोणत्याही वेळी ४ हजार क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर अन्नधान्य वितरण अधिकारी, अमरावती शहर कार्यालयाच्या पथकाने डी-मार्ट परिसर, वियाणे चौक तसेच भोजवानी ट्रेडर्स, गंगाभगस ट्रेडर्स, शिवसहाय खंडेलवाल ट्रेडर्स आणि बद्रीनारायण खंडेलवाल ट्रेडर्स आदी ठिकाणी साखरेच्या साठ्याची प्रत्यक्ष तपासणी केली.संबंधित व्यापारी व वितरकांना केंद्र शासनाच्या अन्नसाठा देखरेख पोर्टलवर साखरेच्या साठ्याची माहिती दर शुक्रवारी अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. साठेबाजीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्था व संबंधितांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी प्रवीण राऊत यांनी दिली.-

# अवैध सावकारीविरोधात विलासनगरात कारवाई

## कोरे स्टॅम्प पेपर, कागदपत्रे जप्त, संजय सचदेवसह महिलेविरुद्ध गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती** स्थानिक विलासनगर भागात अवैध सावकारी प्रकरणाचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी संशयितांच्या ठिकाणावर धाड टाकून कोरे धनादेश (चेक), स्वाक्षरी केलेले कोरे स्टॅम्प पेपर, उधारीच्या चिठ्ठ्या आणि इतर महत्त्वपूर्ण कागदपत्रे जप्त केली आहेत. या प्रकरणी पोलिसांनी संजय सचदेव व एका ५५ वर्षीय महिलेविरुद्ध 'महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियमा'सह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सहकार उपनिबंधक मनोज सुधाकर रोहनकर (वय ४८) यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून आणि प्राथमिक तपासाच्या आधारे पोलिसांनी विलासनगर (गल्ली क्र. ३, व्हीएमव्ही महाविद्यालयाजवळ, साहू बाग परिसर) येथील ठिकाणावर धाड टाकली. या प्रकरणात संजय विनोद सचदेव (वय२८) आणि एका ५५ वर्षीय महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कारवाईदरम्यान त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणावर कोरे चेक, स्वाक्षरी केलेले कोरे स्टॅम्प पेपर आणि उधारीच्या नोंदी असलेल्या चिठ्ठ्या जप्त करण्यात आल्या. या कागदपत्रांचा वापर बेकायदेशीरपणे व्याजाने रकमा देणे आणि वसुलीसाठी धमकावण्यासाठी केला जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आधारे पोलिसांनी आता सखोल तपास सुरू केला आहे. संबंधितांनी आतापर्यंत किती नागरिकांना अवैधपणे व्याजदराने कर्ज दिले, एकूण किती रुपयांची उलाढाल झाली आणि किती लोकांकडून जबरदस्तीने कोरे चेक वा स्टॅम्प पेपर लिहून घेतले, याचा शोध पोलीस घेत आहेत. गाडगेनगर पोलीस प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.-

## चरणदास इखे यांच्या कुटुंबाला ५ लाखांचा धनादेश

### मृताच्या वारसाला शासकीय नोकरी देण्याच्या मागणीचा आरती वानखडे यांनी केला पुनरुच्चार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मोर्शी** – तालुक्यातील भांबोरा येथे शेतात काम करताना वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या शेतकरी चरणदास इखे यांच्या कुटुंबीयांना वनविभागाच्या वतीने तातडीची पाच लाख रुपयांची सानुग्रह मदत देण्यात आली. आरती राजेश वानखडे यांच्या हस्ते शुक्रवारी सकाळी कुटुंबीयांना पाच लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला, चरणदास इखे यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे. घरातील कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याने कुटुंबाला आधार देण्यासाठी आर्थिक मदत देण्यात येणार आहे. त्यापैकी शासनाकडून एकूण २५ लाख रुपयांची पाच लाख रुपयांचा धनादेश तातडीने देण्यात आला असून, उर्वरित मदतही लवकरच मिळणार असल्याचे आरती वानखडे यांनी कुटुंबीयांना आश्वस्त केले. दरम्यान, मृत शेतकऱ्याच्या वारसाला कायमस्वरूपी शासकीय



नोकरी देण्याची मागणी आरती वानखडे यांनी यापूर्वीच केली होती. या मागणीचा त्यांनी पुन्हा एकदा पुनरुच्चार केला. त्यानुसार मृत चरणदास इखे यांच्या मुलाला तातडीने वनविभागात कंत्राटी तत्त्वावर रुजू करून घेण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

शासकीय नोकरी मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राज्य सरकार कडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असून, त्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे आरती वानखडे यांनी स्पष्ट केले. यावेळी आरती राजेश वानखडे, वनविभागाचे आरएफओ प्रशांत भुजाडे, नायब तहसीलदार विनोद वानखडे, प्रा. डॉ. अनिल कडू, छायाताई दंडाळे, प्रदीप गौरखेडे, मंगेश बोंडे, सरपंच अनिल इखे, संजय सातगे, सागर माहोरे, गौरव मडघे, शंकर ठाकरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.-

# अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यरत असल्याचा विद्युत व सार्वजनिक बांधकाम विभागाचा दावा

## अग्निकांडाने निर्माण केले प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती-** जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालक अतिदक्षता कक्षाच्या व्हेंटिलेटरमध्ये स्फोट होऊन २४ ऑगस्ट रोजी पहाटे ३.३० वाजता दुर्दैवी घटना घडली. या घटनेबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग अमरावती मुख्य अभियंता कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

एप्रिल व में २०२६ मध्येच सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाने जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय व इतर रुग्णालयातील अग्रीसूचक व अग्रिशमन यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करून महापालिकेच्या अग्निशमन अधिकाऱ्याकडे फॉर्म-बी सादर करण्याकरता ई-निविदा पूर्ण झालेली होती. संबंधित फायर कंत्राटदारास २३ जून २०२६ रोजीच कार्यारंभ करण्याचा आदेश जारी करण्यात आला होता. विभागाद्वारे आवश्यक कार्यवाही आधीच पूर्ण केलेली आहे. त्यामुळे ३७ दिवस पत्राकडे दुर्लक्ष केल्याची माहिती वस्तुस्थितीला धरून नसल्याचे सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग अमरावती मुख्य अभियंता कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आवश्यक यंत्रणा दुरुस्ती करून कंत्राटदाराने प्राथमिक फायर ऑडिट अहवाल ३० जून २०२६ रोजी सादर केला. संपूर्ण यंत्रणा सुस्थितीत असल्याची शहानिशा करून आली होती. फायर ऑडिट झाले नसल्याची २२ ऑगस्ट रोजी यंत्रणा कार्यान्वित करण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे. बाब वस्तुस्थितीशी सुसंगत नसल्याचे विद्युत संच मांडणीचा दर्जा योग्य असून त्यानुसार वीज संच मांडणी मधील सर्व सुरक्षा उपकरणे संपूर्ण वायरिंग, स्विच,गिझर हे भारतीय मानक ब्यूरो मानांकित व उच्च दर्जाचीच आहेत तसेच रुग्णालयातील अतिदक्षता कक्ष व नवजात बालक कक्षात संच मांडणीत ओव्हर करंट व अर्थ फॉल विद्युत विभागाद्वारे करण्यात आलेल्या विद्युत प्रणालीचा अवलंब करण्यात आला होता व प्रोटेक्शनकरिता त्रिस्तरीय विद्युत सुरक्षा उपकरणे, संपूर्ण वायरिंग, स्विच गिज्जर हे ज्या व्हेंटिलेटरमध्ये स्फोट होऊन ही दुर्दैवी घटना घडली, त्यावेळेस संबंधित व्हेंटिलेटरची ३२ ए क्षमतेची आरसीबीही ट्रीप झालेली होती. ३० जुलै २०२६ रोजी रुग्णालयातील ६१ अग्निशमन यंत्रणांचे रिफिलिंग करून रुग्णालयात पुनः स्थापित करण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे.सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागामार्फत जिल्हा स्त्री रुग्णालयात विद्युतीकरण, अग्नीसूचक आणि अग्निशामक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. मे ते जुलै २०२५ पर्यंत टप्प्याटप्प्याने या रुग्णालयाकडे ही यंत्रणा रीतसरपणे हस्तांतरित करण्यात आली आहे.हस्तांतरणाच्या वेळी महापालिकेचे अग्निशमन अधिकारी, फायर कंत्राटदार, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे अधिकारी- कर्मचारी तथा रुग्णालयातील



अधिकारी - कर्मचारी यांच्यासह संयुक्तपणे संपूर्ण यंत्रणेचे मॉक ड्रिल घेण्यात आले व आपत्कालीन परिस्थितीत ही यंत्रणा कशी हाताळायची याबाबत प्राथमिक सूचना देण्यात आल्या होत्या. संपूर्ण संच मांडणीची देखभाल व दुरुस्ती विषयक कामे विभागाद्वारे नियमितपणे करण्यात येत असल्याचा दावा देखील सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे.


# मेळघाटात चार दिवसांत दोन मातामृत्यू

## आरोग्य विभागातील योजनांच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मेळघाट-** मेळघाटात अवघ्या चार दिवसांत दोन मातामृत्यू झाल्याने आरोग्य विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मातामृत्यू रोखण्यासाठी विविध योजना, नियमित तपासण्या आणि संदर्भसेवा राबविल्या जात असतानाही घटना घडल्याने त्यांच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. चिखलदरा तालुक्यातील टेंब्रूसोंडा प्राथमिक आरोग्यकेंद्रांतर्गत सती येथील सात महिन्यांच्या गर्भवती मातेचा, तर धारणी तालुक्यातील धिंगऱ्या येथील मातेचा मृत्यू झाला.

सलग दोन मातामृत्यूमुळे मेळघाटातील दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्थेची स्थिती पुन्हा चर्चेत आली आहे.

दुर्गम आणि आदिवासी भागातील गर्भवती महिलांना वेळेवर



तपासणी, उपचार तसेच प्रकृती गंभीर झाल्यास पुढील उपचारासाठी संदर्भसेवा उपलब्ध करून देणे ही आरोग्य यंत्रणेची जबाबदारी आहे. मात्र, या दोन्ही घटनांमुळे गर्भवती महिलांच्या आरोग्यसेवेतील नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीचा आढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे. सती येथील मातेचा वेळेवर प्राथमिक उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे मातेची वेळेत तपासणी झाली होती का, प्रकृती गंभीर झाल्यानंतर योग्य वेळी पुढील उपचारासाठी संदर्भीत करण्यात आले का? आणि रुग्णवाहिका व संदर्भसेवा वेळेत उपलब्ध झाली का? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. या मृत्यूची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून उपचारातील प्रत्येक टप्प्याची तपासणी करण्याची मागणी होत आहे. माता व बालमृत्यू रोखण्यासाठी गर्भवती महिलांची नोंदणी, नियमित तपासण्या, जोखमीच्या गर्भधारणेची ओळख आणि वेळेवर संदर्भसेवा यावर भर दिला जातो. मात्र, मातामृत्यूच्या घटना सुरूच असल्याने या योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे मूल्यमापन करण्याची गरज आहे. दोन्ही मातामृत्यूंची निष्पक्ष चौकशी करून मृत्यूचे नेमके कारण, उपचारातील विलंब अथवा त्रुटी आणि त्यासाठी जबाबदार घटक निश्चित करावेत, अशी मागणी होत आहे. दोष आढळल्यास कारवाईसोबतच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी दुर्गम भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्याची गरज आहे.

आहाड येथील माता सती गावातील आईकडे आली होती. रात्री तिची प्रकृती अचानक बिघडून तिला झटके आले. मात्र, कुटुंबीयांनी याबाबत माहिती दिली नाही. दुसऱ्या दिवशी आशासेविकेला माहिती मिळताच तिला टेंब्रूसोंडा प्राथमिक आरोग्यकेंद्रात आणण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने अचलपूर येथे संदर्भीत करण्यात आले. मात्र, अचलपूरकडे नेत असतानाच रस्त्यात तिचा मृत्यू झाला.

– **डॉ. विवेक नायडू,** तालुका वैद्यकीय अधिकारी, चिखलदरा.

# राजेश बेठेकर मृत्यू प्रकरणी मृतदेह बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू

## कुटुंबीयांकडून संचालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती :**

अमरावती येथील वादग्रस्त महर्षी पब्लिक स्कूलमधील आदिवासी विद्यार्थी राजेश बेठेकर यांच्या मृत्यू प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. राजेशच्या मृत्यूला शाळा प्रशासनाचा हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा कारणीभूत असल्याचा आरोप करीत त्याच्या कुटुंबीयांनी शनिवारी चिखलदरा पोलिस ठाण्यात धाव घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी शुभम जवंजाळ यांच्या नेतृत्वाखाली राजेशचे वडील बाबू साबूलाल बेठेकर, भाऊ आशिष बाबू बेठेकर, विलास भालधरे यांच्यासह नातेवाईकांनी पोलिस ठाण्यात उपस्थित राहून महर्षी पब्लिक स्कूलच्या व्यवस्थापनाविरोधात कारवाई करण्याची मागणी केली.महर्षी पब्लिक स्कूलचे संचालक प्रशांत राठी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. राजेशची प्रकृती खालावलेली असतानाही शाळा प्रशासनाने त्याच्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. योग्य वेळी उपचार न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.दरम्यान, नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांकडून मर्ग दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राजेशचा मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन करण्यासाठी उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे (एसडीएम) परवानगी मागण्यात आल्याची माहिती आहे. येत्या सोमवारी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.दरम्यान, राजेशसोबत प्रकृती बिघडलेला त्याचा चुलत भाऊ रामप्रसाद बेठेकर याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. रामप्रसाद याला अन्नातून विषबाधा झाल्याचा डॉक्टरांचा वैद्यकीय अहवाल राजेशच्या वडिलांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीसोबत सादर केला आहे.या प्रकरणात पोलिसांकडून तपास सुरू असून, शवविच्छेदन अहवाल, वैद्यकीय कागदपत्रे आणि तपासातून समोर येणाऱ्या तथ्यांच्या आधारे राजेश बेठेकर यांच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. त्यानंतर या प्रकरणात कोणाची जबाबदारी निश्चित होते, हे स्पष्ट होणार आहे.




# जिल्हा महिला रुग्णालयात चित्रा वाघ यांची अधिकाऱ्यांना फटकार

## नवजात बाळाला घरी सोडण्यासाठी १०८ रुग्णवाहिकेत डिझेल नसल्याने चित्रा वाघ संतापल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती :**

अमरावतीच्या जिल्हा महिला रुग्णालयात सोमवारी झालेल्या भीषण अग्निकांडानंतर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी आज रुग्णालयाला भेट देत पाहणी केली. यावेळी एका नवजात बाळाला घरी सोडण्यासाठी १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देताना डिझेल नसल्याचे कारण सांगितल्याची तक्रार त्यांच्या कानावर पडली. यामुळे चित्रा वाघ वैद्यकीय अधिकाऱ्यांवर चांगल्याच संतापल्या.

नवजात बाळाला घरी घेऊन जाण्यासाठी रुग्णवाहिकेची आवश्यकता होती. मात्र, रुग्णवाहिकेत डिझेल उपलब्ध नसल्याने सेवा देता येणार नसल्याचे रुग्णाच्या नातेवाईकांना सांगण्यात आले होते. ही माहिती मिळताच चित्रा वाघ यांनी प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार आणि संबंधित कर्मचाऱ्यांना चांगलेच फटकारले.सरकार आरोग्य सुविधांसाठी काम करत आहे; मात्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अशा निष्काळजीपणामुळे सरकारची बदनामी होते, अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली.रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना शासकीय सुविधांचा लाभ वेळेत मिळालाच पाहिजे. डिझेल उपलब्ध नसल्यासारखी कारणे सांगून रुग्णांना रुग्णवाहिका सेवेपासून वंचित ठेवू नये, असे निर्देश चित्रा वाघ यांनी अधिकाऱ्यांना दिले. तसेच नवजात बाळाला तातडीने घरी पोहोचविण्यासाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्याचे आदेशही त्यांनी दिले.दरम्यान, जिल्हा महिला रुग्णालयातील अग्निकांडानंतर रुग्णालयाच्या व्यवस्थेवर आधीच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यातच रुग्णवाहिकेत डिझेल नसल्याची तक्रार समोर आल्याने रुग्णालय प्रशासनाच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.



# सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षिततेसाठी चांदूर रेल्वेत शाळांमध्ये जनजागृती

## पोलीस विभागाचा उपक्रम, विद्यार्थ्यांना सायबर फसवणूक, ऑनलाइन गेमिंग व एपीके फाइलपासून सावध राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदूर रेल्वे**

सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी चांदूर रेल्वे पोलीस विभागाच्या वतीने शहरातील विविध शाळांमध्ये मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, अनोळखी व्यक्तींपासून दूर राहणे, मोबाइल गेमिंगचे दुष्परिणाम तसेच बनावट लिंक व एपीके फाइलच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीबाबत माहिती देण्यात आली. चांदूर रेल्वे शहरातील जिजामाता कन्या शाळा, जि.प. माध्यमिक शाळा, सरस्वती प्राथमिक शाळा तसेच नगरपरिषद पूर्व नेहरू प्राथमिक शाळा येथे हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी एपीआय मनीषा सामटकर तसेच पोलीस उपनिरीक्षक नंदलाल लिंगोट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या संदेशांना, लिंकला किंवा फाइलला प्रतिसाद देऊ नये, तसेच वैयक्तिक माहिती कोणाशीही शेअर करू नये, असे आवाहन करण्यात आले. सायबर फसवणूक झाल्यास अथवा संशयास्पद व्यवहार लक्षात आल्यास तात्काळ सायबर हेल्पलाइन १९३० वर संपर्क साधावा. तसेच सायबर फसवणूक, सिमकार्ड, मोबाइल किंवा दूरसंचाराशी संबंधित तक्रारींसाठी १९४५ वर संपर्क करण्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यासोबतच अनोळखी एपीके फाइल डाउनलोड किंवा इन्स्टॉल करू नये, क्युआर कोड स्कॅन करण्यापूर्वी त्याची खात्री करावी आणि सोशल मीडियाचा वापर काळजीपूर्वक करावा, असेही पोलिसांनी सांगितले. मोबाइलचा वाढता वापर, ऑनलाइन गेमिंग आणि इंटरनेटच्या माध्यमातून होणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सायबर अवेअरनेस जनजागृती कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी स्वतः सुरक्षित राहण्यासोबतच आपल्या कुटुंबीयांनाही सायबर सुरक्षेबाबत जागरूक करावे, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले.




# 'डफरीन' मध्ये ८ दिवसात सुरु होणार तात्पुरते ३० मिनी बेडचे 'एसएनसीयू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती–**

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात २४ ऑगस्ट रोजी लागलेल्या आगीत ३ बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर रुग्णालया तील एसएनसीयू पूर्णपणे बंद आहे. दरम्यान बालरुग्णां ची गैरसोय होऊ नये यासाठी आरोग्य विभागाने युद्धपातळीवर हालचाली सुरू केल्या आहेत. डफरीन रुग्णालयात तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येकी १५ बेडचे दोन एसएनसीयू उभारण्यात येणार असून, येत्या सात ते आठ दिवसांत ही सुविधा सुरू करण्याचे नियोजन आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावरील एसएनसीयूमध्ये आग लागली होती. या दुर्घटनेत आउटबॉर्न युनिटमधील तीन बालकांचा मृत्यू झाला.

फॉरेन्सिक पंचनामा पूर्ण झाल्यानंतर संबंधित युनिट सील करण्यात आले आहे. दरम्यान, त्याला लागून असलेल्या अन्य दोन युनिटच्या स्वच्छतेचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, स्त्री रुग्णालयातील कायमस्वरूपी एसएनसीयूची यंत्रणा पूर्ववत करण्यास वेळ लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे तोपर्यंत नवजात आणि गंभीर अवस्थेतील बालकांना उपचार मिळावेत, यासाठी डफरीन रुग्णालयात पर्यायी एसएनसीयू उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पहिल्या मजल्यावर १५, तर तळमजल्यावर १५ असे एकूण ३० मिनीबेडचे दोन तात्पुरते एसएनसीयू युनिट उभारण्यात येणार आहेत

# जिल्हा स्त्री रुग्णालयात गलथान कारभाराचा आरोप

## प्रसूती कळा सुरु झालेल्या महिलेला नागपूरला रेफर करण्याची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

जिल्हा स्त्री रुग्णालयात तीन नवजात बाळांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याच्या घटनेनंतरही रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रसूतीसाठी गेल्या पाच दिवसांपासून रुग्णालयात दाखल असलेल्या गर्भवती महिलेला प्रसूती कळा सुरू झाल्यानंतर उच्च उपचारांसाठी नागपूरला रेफर करण्याचा सल्ला देण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

महिलेची प्लेटलेट संख्या ४८ हजार असल्याने आयसीयू व्यवस्थापनाची आवश्यकता लक्षात घेऊन पीडीएमसी किंवा जीएमसी नागपूर येथे रेफर करण्याचा सल्ला दिल्याचे जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सानिका इंगळे यांनी सांगितले. महिलेवर चार प्लेटलेट्स चढवण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यासाठी १०८ वर सातत्याने संपर्क साधला जात होता. मात्र, रुग्णवाहिकेची व्यवस्था होण्यापूर्वीच कुटुंबीयांनी घाईघाईने खासगी वाहनातून महिलेला दुसऱ्या रुग्णालयात नेल्याचे डॉक्टरांनी सांगितले.दरम्यान, प्रसूतीची वेळ जवळ आलेली असताना आणि रुग्णालयात पाच दिवस उपचार सुरू असताना रेफर करण्याची वेळ का आली? रुग्णवाहिका वेळेत का उपलब्ध झाली नाही? गरीब रुग्णांना तातडीच्या उपचारांसाठी अशी धावपळ का करावी लागते? असे गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.रुग्णालय प्रशासनाने मात्र महिलेची प्रकृती आणि कमी प्लेटलेट संख्या लक्षात घेऊन उच्चस्तरीय उपचारासाठी रेफर करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे.




# भांबोऱ्यात वाघिणीची दहशत कायम

## रस्ते निर्मनुष्य, गुरे-ढोरे चाऱ्याअभावी उपाशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मोर्शी –**

तालुक्यातील जुना भांबोरा शिवारात वाघिणीच्या हल्ल्यात शेतकरी चरणदास ईखे यांचा गुरुवारी मृत्यू झाल्यानंतर परिसरात वाघिणीची दहशत कायम आहे. भीतीच्या वातावरणामुळे शेतकरी, शेतमजूर तसेच गुरे-ढोरेही शेतशिवाराकडे फिरकले नसल्याने गावातील रस्ते शुक्रवारी निर्मनुष्य दिसून आले. गुरेढोरे रानात चरायला न गेल्याने अनेक जनावरे चारा-पाण्यावाचून उपाशी असल्याचे चित्र आहे.वनविभागाच्या वतीने कुटुंबीयांना पाच लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. गावकऱ्यांनी मृत शेतकऱ्याच्या मुलाला कायमस्वरूपी नोकरी देण्याची तसेच परिसरातील वन्यप्राण्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी केली.घनदाट जंगलामुळे शेतात जाणे धोकादायक बनले असून शेतीची कामे ठप्प झाली आहेत. पावसाने उघडीप दिल्याने पिकांना ओलिताची गरज असताना वाघिणीच्या भीतीमुळे शेतकरी शेतात जाण्यास धजावत नाहीत. पिंपळखुटा मोठा, नया वाठोडा, राजुरवाडी, कवठाळ आणि येवती परिसरातील शेतकरी व शेतमजूरही शुक्रवारी शेतशिवारात फिरकले नाहीत.येवती व अंतोरा परिसरातही वाघिणीचा वावरशुक्रवारी सकाळी येवती परिसरात वाघिणीचा वावर वनविभागाच्या निदर्शनास आला. दुपारी वर्धा नदीच्या तीरावरून अंतोरा गावालगतच्या जंगलातही वाघिणीचे लोकेशन मिळाल्याची माहिती आहे. त्यामुळे वर्धा नदीच्या दोन्ही तीरावरील गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.वनपरिक्षेत्र अधिकारी योगिता मगर यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. वनविभागाने काही ठिकाणी पिंजरे लावून शोधमोहीम सुरू केली असून अंतोरा, तुळजापूर, लहान आर्वी आणि आष्टीसह परिसरातील गावांना विशेष सावधगिरीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



# मी जरांगेला भाव देत नाही; काँग्रेस नेत्याची सडकून टीका




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चंद्रपूर–** काँग्रेसचे नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे पाटील आणि राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून आपली रोखठोक भूमिका मांडली. मी जरांगेंना फारसं महत्त्व किंवा भाव देत नाही. जरांगे यांनी सरकारचे कपडे उतरावावेत आणि सरकारने जरांगेचे कपडे उतरवावेत. त्यांनी एकमेकांशी काय लढावं, याच्याशी आम्हाला काही घेणं-देणं नाही, असा टोला वडेट्टीवारांनी लगावला.

आरक्षणाच्या प्रमाणपत्रावर बोलताना ते म्हणाले, आमच्या वाट्याचं कुणालाही देऊ नये आणि आमच्या वाट्याचं कोणी हिरावून घेऊ नये. ज्याप्रमाणे एथड साठी आरक्षण १० टक्क्यांनी वाढवून ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली, त्याचप्रमाणे गरज असल्यास आणखी १० ते २० टक्के आरक्षण वाढवून दिले पाहिजे.

ओबीसींमधील जातींचा उल्लेख करत वडेट्टीवार म्हणाले, ओबीसींमध्ये आधीच ३८६ जातींचा समावेश आहे. आधी चार पोटा होत्या, आता आणखी चार पोटा वाढल्यानंतर पोळीचा आकारही वाढवला पाहिजे. जरांगेंच्या नादाला कुणी लागावं हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे, परंतु ओबीसींच्या नादाला कुणीही लागू नये, हा आमचा स्पष्ट इशारा आहे.

# डफरीनचे दोन अतिदक्षता विभाग तातडीने सुरु करण्यासाठी युद्धपातळीवर हालचाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती –** जिल्हा स्त्री रुग्णालय अर्थात डफरीनमधील उर्वरित अतिदक्षता विभाग तातडीने सुरू करण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहेत. शुक्रवारी रुग्णालय प्रशासनासह संबंधित विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त बैठक घेऊन बंद असलेल्या अतिदक्षता विभागांची प्रत्यक्ष पाहणी केली. सध्या या विभागांमध्ये स्वच्छतेसह आवश्यक तांत्रिक कामे करण्यात येत आहेत. डफरीन रुग्णालयात नवजात शिशू अतिदक्षता विभाग (एनआयसीयू) व विशेष नवजात शिशू अतिदक्षता विभाग (एसएनसीयू) मिळून तीन अतिदक्षता विभाग कार्यरत होते. मात्र, यापैकी एका विभागात व्हेंटिलेटरचा स्फोट झाल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव तिन्ही विभाग बंद करण्यात आले आहेत.दरम्यान, रुग्णालयात नव्याने जन्म घेणाऱ्या बाळांची गैरसोय होऊ नये आणि त्यांना तातडीची वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी स्फोटग्रस्त विभाग वगळता उर्वरित दोन अतिदक्षता विभाग सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.यासंदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार, डफरीनच्या डॉ. प्रीती इंगळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत शाखेचे कार्यकारी अभियंता सागर शेंडे यांच्यासह अन्य संबंधित अधिकाऱ्यांची बैठक झाली. अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे पाहणी करून आवश्यक कामांचा आढावा घेतला तसेच हे विभाग किती दिवसांत सुरू करता येतील, याची चाचपणी केली.




सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकन्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला
आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :